सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान (अनिवार्य) वितरीत करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक -मराग्रं-२५२७/प्र.क्र.९१/२०१८/साशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९.

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३,दि.०२.०४.२०१८.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२५२७/(९१/१८)/साशि-५, दि.१९.०५.२०१८.
३) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ३२/२०१८- १९/११६२६-२७, दि. १३.१०.२०१८.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३,दि. २५.०१.२०१९.

प्रस्तावना :

राज्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. २,०९,८८,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी नऊ लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. १ नुसार अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ७०% ऐवढी विहित करण्यात आलेली होती. त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये अर्थसंकल्पित तरतुदीपैकी ७०% निधीच्या मर्यादेत रु. १,४६,९०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी शेहेचाळीस लाख नव्वद हजार फ़क्त) एवढा निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता संदर्भ क्र. ४ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ९०% ऐवढी विहित करण्यात आलेली आहे. यानुषंगाने शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२२०५ ११९६) ३१-सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित निधीच्या ९० टक्के च्या मर्यादेत रु. ४१,९९,२००/-(रु. एक्केचाळीस लाख नव्याण्णव हजार दोनशे फक्त)वितरीत करुन खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:

राज्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. २,०९,८८,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी नऊ लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. १ नुसार अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ७०% ऐवढी विहित करण्यात आलेली होती. त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये अर्थसंकल्पित तरतुदीपैकी ७०% च्या मर्यादेत निधी रु. १,४६,९०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी शेहेचाळीस लाख नव्वद हजार फ़क्त) एवढा निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता संदर्भ क्र. ४ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ९०% ऐवढी विहित करण्यात

आलेली आहे. त्यानुसार अर्थसंकल्पित निधीपैकी ९०% निधीच्या मर्यादेत रु. ४१,९९,२००/- (अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख नव्याण्णव हजार दोनशे फ़क्त) इतका निधी वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च मागणी क्र. डब्ल्यु-४, २२०५-कला व संस्कृती,१०५-सार्वजनिक ग्रंथालये,(०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना(०४)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने(ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्य)(२२०५ ११९६)(अनिवार्य) ३१-सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली शासनमान्य सार्वजनिक (ग्रामपंचायत)ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानाचा खर्च चालू वर्ष सन २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पित तरतूदीपैकी ९० टक्केच्या मर्यादेत वितरीत निधीतून भागविण्यात यावा.

३. सदरचा खर्च करण्यासाठी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना आहंरण व संवितरण अधिकारी व ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. ग्रामपंचायत ग्रंथालयांचे अनुदान ECS/DBT/NEFT व्दारे त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे. अनुदानाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित कार्यालय प्रमुखांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२.०४.२०१८ व दि. २५.०१.२०१९ च्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२२६१२१७०५७४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2019.02.26 12:22:10 +05'30'

(अनिल वि.सावरे)
कार्यासनअधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल -२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
६. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. सचिव (उ.व.तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती (साशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.